संपादकीय
राकेश शंकर गोरे

# स्थैर्याकडून सामर्थ्याकडे




सरकारने गेल्या दहा वर्षांत साधलेली अर्थव्यवस्था आणि साधलेल्या प्रगतीचा आलेख अंतिम अर्थसंकल्पाच्या निमित्ताने मांडला. त्याबरोबरच आर्थिक धोरणांचा केंद्रबिंदू असणारे चार महत्त्वाचे घटक विशद केले.. 'लेखानुदान' किंवा हंगामी अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत सादर केला. सार्वत्रिक निवडणूक आता दोन महिन्यांत अपेक्षित आहे. सरकारच्या प्रासंगिक आर्थिक व्यवहारांमध्ये खंड पडू नये, यासाठी अंतिम अर्थसंकल्प सादर केला जातो. नवीन सरकार येईपर्यंत 'नाइट वॉचमन'चे काम करणे, एवढाच त्याचा उद्देश असतो. अशा हंगामी अर्थसंकल्पात मोठे धोरणात्मक किंवा आर्थिक कायद्यात व करप्रणालीत बदल करू नयेत, असा संकेत असतो. त्याचे तंतोतंत पालन अर्थमंत्र्यांनी केले. त्यामुळे त्यांचे भाषणही आटोपशीर होते. अर्थात, अर्थसंकल्प सादर करण्याच्या निमित्ताने सरकारच्या कामगिरीचा आढावा घेऊन त्याचे छापील पुस्तकरूप माध्यमे व नागरिकांपुढे ठेवता येते. पुढील काळात आपले सरकार सत्तेवर आले, तर आर्थिक प्रगतीची दिशा व धोरणे काय असतील, हे मांडण्याचीही ही एक संधी असते. निर्मला सीतारामन यांनी या दोन्ही उद्दिष्टांसाठी आजच्या व्यासपीठाचा सुयोग्य उपयोग केला. संपूर्ण अर्थसंकल्पापूर्वी आर्थिक सर्वेक्षणाचा सविस्तर अहवालही सादर केला जातो. पण प्रस्तुतचा अर्थसंकल्प 'हंगामी' असल्यामुळे अशा सर्वेक्षणाऐवजी एक संक्षिप्त पुनरावलोकन सरकारच्या आर्थिक सल्लागारांनी ३१ जानेवारी रोजी सादर केले होते. सरकारच्या कामगिरीचे सिंहावलोकन सामान्यतः पाच वर्षांसाठी केले जाते. पण २०१४ पासून तेच सरकार असल्याने ही कक्षा दहा वर्षांसाठी वाढवली होती. २०१३ मध्ये आपल्याकडे परकी चलनाचा मोठा पेचप्रसंग उभा राहिला होता. चालू खात्यावरची तूट प्रमाणाबाहेर वाढली होती. डॉलरच्या तुलनेत रुपया ५४ वरून ६९ पर्यंत गडगडला होता.

अतिशय नाजूक स्थिती असणाऱ्या पाच अर्थव्यवस्थांमध्ये भारत गणला जात होता. भाववाढीचा दर दहा टक्क्यांवर गेला होता. रिझर्व्ह बँकेने व्याज दर ३.५० टक्के वाढविले, आणि सरकारी कंपन्यांनी करमुक्त कर्जरोखे अतिशय आकर्षक दराने बाजारात आणले. परदेशातून येणाऱ्या बँकठेवींना सरकारने संरक्षण दिले आणि ही आणीबाणीची परिस्थिती नियंत्रणात आणली गेली होती. त्या नाजूक परिस्थितीमधून प्रथम स्थैर्याकडे आणि नंतर सामर्थ्याकडे आपल्या अर्थव्यवस्थेचा प्रवास याच दहा वर्षांत झाला असल्यामुळेसुद्धा ही दहा वर्षांची कसोटी लावणे सयुक्तिक ठरते. आर्थिक सल्लागारांच्या अहवालात मुख्यत्वे याच विषयाचा ऊहापोह केलेला आहे. गेल्या दहा वर्षांत आपण अनेक स्थित्यंतरातून गेलो आहोत. नोटाबंदी, वस्तुसेवा कर (जीएसटी), बँकांमधील थकित बुडित कर्जाच्या समस्येचे निराकरण, कोविड-१९चे जागतिक महासंकट आणि रशिया-युक्रेन युद्धानंतर भडकलेले कच्च्या तेलाचे दर या सर्व संकटांचा सामना करीत आज आपण इंग्लंडला मागे टाकून जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झालो आहोत.

कोविडमध्ये जगातील सर्वच देशांच्या आर्थिक वाढीचा दर ह्यउणेह्न झाला होता. पण त्यानंतर सातत्याने तीन वर्षे आपण ७% दराने आर्थिक वाढ केली आहे. जगाच्या वाढीचा दर जेमतेम २% असताना सर्वाधिक वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था भारत ठरला आहे. आपली परकी चलनाची गंगाजळी ६०० अब्ज डॉलर आहे आणि भाववाढही सहा टक्क्यांपेक्षा कमी राखली गेली आहे. वित्तीय तूट मर्यादेत ठेवणे, हे विवेकी धोरणाचे उद्दिष्ट असते. आजच्या अर्थसंकल्पामध्ये, २०२३-२४ या वर्षासाठी वित्तीय तूट ५.८ टक्क्यांवर आल्याचे अर्थमंत्र्यांनी नमूद केले. गेल्यावर्षी अर्थसंकल्प मांडताना प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा हे प्रमाण कमी आहे. याचे मुख्य श्रेय करसंकलनात आलेल्या उभारीला आहे. या वर्षी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे एकूण संकलन २३.२४ लाख कोटी इतके झाले. २०२४-२५ वर्षाच्या अंदाजात हे २६.०२ लाख कोटी इतके गृहित धरले आहे. म्हणजे सुमारे बारा टक्क्यांची वाढ प्रस्तावित आहे. ७% दराने आर्थिक वाढ झाल्यास हे लक्ष्य निश्चितच आवाक्यात आहे. त्यामुळे कर्जरोख्यांच्या माध्यमातून सरकार करीत असलेली कर्ज उभारणी मागील वर्षीपेक्षा कमी, म्हणजे ११.७५ लाख कोटी इतकीच निव्वळ रक्कम राहील. याचा लाभ कंपन्या आणि उपभोक्ता कर्जासाठी अधिक रक्कम उपलब्ध होण्यामुळे होईल. व्याजाचे दर कमी होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. आर्थिक धोरणांचा केंद्रबिंदू असणारे चार महत्त्वाचे घटक म्हणजे अन्नदाता शेतकरी, महिला, युवक आणि समाजातील गरीब वर्ग; आगामी सरकारी धोरण या चारही घटकांची क्षमता वाढविण्यासाठी कसे योजले जात आहे, हे अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# KNOW THESE 5 BENEFITS OF EARTH APPLE



The artichoke, with its spiky exterior and heart-shaped core, often sits on grocery shelves shrouded in mystery. But beneath its tough facade lies a delicious and nutritious treat packed with surprising health benefits. Contrary to popular belief, the artichoke isn't a vegetable, but rather the immature flower bud of a thistle plant. Native to the Mediterranean, it has been cultivated for centuries for both culinary and medicinal purposes. Today, artichokes are enjoyed worldwide for their unique flavour and impressive nutritional profile. Let's delve into the world of artichokes, exploring their essence and unveiling five reasons why you should embrace these unique buds.

**Antioxidant richness:** Artichokes are abundant in antioxidants, with flavonoids and polyphenols taking centre stage. These compounds serve as formidable warriors against free radicals, the unstable molecules that can wreak havoc in the body. By neutralising these free radicals, artichokes may help reduce the risk of chronic diseases and contribute to overall health.

**Digestive support:** Diving into the digestive benefits of artichokes reveals their high fibre content as a crucial player. Dietary fibre aids in maintaining a healthy digestive system by facilitating the smooth movement of food through the digestive tract. The inclusion of earth apples in your diet can assist in preventing constipation and promoting optimal digestive function.

Keeps heart healthy by improving cholesterol: Artichokes contribute significantly to heart health through a dual mechanism. Firstly, their fibre content plays a role in regulating cholesterol levels, potentially reducing the risk of cardiovascular issues. Secondly, the ample potassium in artichokes supports healthy blood pressure, adding an extra layer of protection for your cardiovascular system.

**Keep a check on your weight:** Artichokes emerge as a valuable ally for those on a weight management journey. The high fibre content not only aids in digestion but also creates a sense of satiety, potentially reducing overall calorie intake. Moreover, artichokes are low in calories and fat, making them a nutritious and satisfying choice for individuals focused on weight maintenance or loss.

**Liver detoxification support:** The liver-cleansing properties of artichokes are attributed to compounds like cynarin. These compounds stimulate bile production, crucial for breaking down fats and promoting optimal liver function. Integrating earth apples into your diet can contribute to the overall health and efficiency of this vital organ.

# गॅसच्या बर्नरवर भाजलेली भाकरी-चपाती खाल्ल्याने कॅन्सर होऊ शकतो?



आपल्या रोजच्या जेवणात चपाती, पोळी किंवा फुलका, भाकरी हा अविभाज्य भाग आहेत. भाकरी, चपाती, फुलका बनवण्याची पद्धत देशभर सारखीच आहे. फक्त ती चांगली भाजली जावी, खमंगपणा यावा, म्हणून आजही चपाती, भाकरी, फुलके चुलीच्या ज्वाला किंवा विस्तवा अथवा निखाऱ्यावर भाजली जाते. तसेच अशा प्रकारे भाजलेली चपाती, भाकरी खायलाही चवदार लागत असते. मात्र हल्ली चपाती किंवा भाकरी भाजण्याचे काम गॅसवर केले जाते. बाजारात उपलब्ध असलेल्या प्लिअर्समुळे हे आणखी सोपे झाले आहे. पण अशा भाजलेल्या चपातींमुळे तुम्हाला कॅन्सर होऊ शकतो, असे एका संशोधनातून पुढे आले आहे.

**गॅसच्या बर्नरवर चपाती किंवा भाकरी भाजल्याने नेमके काय होते?**

गॅसवरील बर्नरवर भाकरी किंवा चपाती भाजल्याने भाकरी-चपातीमध्ये हेटेरोसायक्लिक अमाइन आणि पॉलीसायक्लिक अरोमॅटिक हायड्रोकार्बन्स तयार होतात. त्यांना कार्सिनोजेन्स म्हणतात. या घटकांच्या सेवनामुळे मानवी कर्करोगाचा धोका असतो. पर्यावरण विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी संबंधित न्यूट्रिशन अँड कॅन्सर जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालात असा दावा करण्यात आला आहे.

कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन डायऑक्साइड आणि सूक्ष्म कण गॅसवर चालणाऱ्या शेगडीतून जळल्या ज्वालांमधून बाहेर पडतात. हे पदार्थ थेट चपातीत असतात, जागतिक आरोग्य संघटनेनुसार हे घटक आरोग्यासाठी हानिकारक आहेत, त्यामुळे मानवाला श्वसन व हृदयाशी संबंधित विकार होऊन कर्करोग होण्याचा धोका असतो. गरम ज्वाळांवर भाजताना गव्हामध्ये असलेली नैसर्गिक साखर आणि प्रथिने एकत्र गरम केल्यावर त्यातून तयार होणारे रासायनिक ॲक्रिलामाइड शरीरासाठी घातक ठरते. अनेक वर्षे चुलीवर शिजवताना निखाऱ्यावर भाकरी, चपाती भाजली जायची. पण अशीच कृती जर तुम्ही गॅसव केली तर तुमच्या जीवावर धोकादायक ठरु शकते. त्यामुळे तुम्ही पण जर गॅसच्या बॅर्नरवर जर चपाती किंवा भाकरी भाजत असाल तर वेळीच सावध व्हा... तुम्हाला जर चपाती किंवा भाकरी बनवायची असेल तर तुम्ही हलक्या कपड्यांसह चपाती दाबून करु शकता. त्यामुळे चपाती आणि सर्व पदार्थ व्यवस्थित शिजतात.

**संशोधनातून आले समोर**

तसेच जर्नल ऑफ एन्व्हायर्नमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजीमध्ये एक संशोधन करण्यात आलं. यामध्ये असं म्हटलं गेलं आहे की, कुकटॉप्स आणि एलपीजी गॅस स्टोव्हमधून नायट्रोजन डायऑक्साइड आणि कार्बन मोनोऑक्साइड यासारखे अनेक धोकादायक वायू उत्सर्जित होत असतात. हे वायू आपल्या आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक असल्याचं वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) ने म्हटलं आहे.

# मृत्युच्या दारातून थोडक्यात बचावली मानसी नाईक; 2 वेळा झाला होता गंभीर अपघात



अभिनयासह नृत्यकौशल्यामुळे चर्चेत येणारी अभिनेत्री म्हणजे मानसी नाईक. गेल्या कित्येक वर्षांपासून कलाविश्वात सक्रीय असलेली मानसी मध्यंतरी तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली होती. मानसीने तिच्या वैवाहिक जीवनाविषयी अनेक धक्कादायक गोष्टींचा खुलासा केला. अभिनेत्री भार्गवी चिरमुले हिला दिलेल्या मुलाखतीमध्ये तिने हे खुलासे केले होते. याच मुलाखतीमध्ये तिने अंगावर काटा आणणारा प्रसंग सांगितला आहे. तब्बल २ वेळा मानसी मृत्युच्या दारातून परत आली आहे. रात्रीचा प्रवास करत असताना तब्बल २ वेळा मानसीचा गंभीर अपघात झाला. या अपघातातून ती थोडक्यात बचावली. मात्र, मनात कायम भीतीने घर केलं आहे. ₹एक्स्प्रेस हायवेवरुन जात असताना दोन वेळा माझा गंभीर अपघात झाला. एका अपघातात माझी संपूर्ण टीम माझ्यासोबत होती. त्या अपघातामध्ये माझ्या डोळ्याला लागलं होतं. सुदैवाने मी डोळे बंद करुन गाडीत बसले होते त्यामुळे मी थोडक्यात बचावले. पण, माझे बॉडीगार्ड पुढे बसले होते. त्यांच्या डोक्याला मात्र प्रचंड मार लागला होता. माझ्यासोबत असलेल्या मुलीला सुद्धा मार लागला होता₹, असं मानसीने सांगितलं.

## राम'मय' झाली अवघी मुंबई !
# गेटवे ऑफ इंडियाला पार पडलं गीतरामायण



अयोध्येतील राम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा २२ जानेवारीला पार पडला. ऐतिहासिक सोहळ्याने संपूर्ण देशात राममय वातावरण निर्माण झालं. अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर अखेर प्रभू राम आल्याने देशभरातील सर्व स्तरातील लोकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. देशभरात विविध ठिकाणी महाकाव्य रामायण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत. नुकतंच मुंबई जय श्री रामाच्या घोषणांनी न्हाऊन निघाली.नुकतंच महाकाव्य रामायणाच्या कार्यक्रमाचं गेटवे ऑफइंडिया येथे आयोजन करण्यात आलं होतं. राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने हा कार्यक्रम पार पडला. यावेळी 'स्वयें श्रीराम प्रभू ऐकती, दशरथा घे हे पायसदान, राम जन्मला ग सखे, चला राघवा चला, स्वयंवर झाले सीतेचे', अशा अजरामर गीतांचे सादरीकरण करुन उपस्थितांना मोहिनी घातली.

# 'मन धागा धागा जोडते नवा'मधील आनंदीचा मेकओव्हर, सासूबाईंचं चॅलेंज स्वीकारत पुन्हा सासरी करणार गृहप्रवेश



महाराष्ट्राचे स्टार प्रवाह वाहिनीवरील 'मन धागा धागा जोडते नवा' मालिकेनं कमी कालावधीत रसिकांच्या मनात घर केले. या मालिकेतील आनंदी आणि सार्थक या जोडीने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला आहे. त्यांची केमिस्ट्री चाहत्यांना खूप भावते. सार्थक आनंदीला पत्नी मानत असला तरी राजाध्यक्ष कुटुंबाने अद्याप तिला सून म्हणून स्वीकारलेलं नाही. मात्र आता मालिका उत्कंठावर्धक वळणावर आली आहे. स्वतःमध्ये सकारात्मक बदल करत आनंदी आयुष्याची नव्याने सुरुवात करणार आहे.

सार्थकचे आनंदीवर जीवापाड प्रेम आहे. तो आपल्या प्रत्येक कृतीतून आनंदीवरचं प्रेम आणि तिच्याविषयी वाटणारा आदर व्यक्त करताना दिसतो. त्याच्यासारखा समजून घेणारा आणि चांगल्या-वाईट प्रसंगांमध्ये खंबीरपणे पाठीशी उभा रहाणारा जोडीदार मिळाला तर आयुष्य सुखकर होते, हे सांगण्याचा प्रयत्न मालिकेतून केला आहे. घटस्फोटानंतरही प्रत्येकाला आपलं आयुष्य पुन्हा नव्याने जगण्याचा अधिकार आहे हा विचार पटवून देणारी ही मालिका म्हणूनच प्रेक्षकांना जवळची वाटते.

मालिकेत सार्थकने जरी आनंदीला पत्नीचे हक्क दिले असले तरी राजाध्यक्ष कुटुंबाने मात्र तिला मनापासून स्वीकारलेलं नाही.

## HEALTH AND SPORTS

# 'I MISSED A STUMPING, CROWD CHANTED DHONI DHONI... USED TO GO BACK TO MY ROOM AND CRY': RISHABH PANT ON TOUGH TIMES




**NEW DELHI:** Pant, currently in recovery after suffering a life-threatening car crash in December 2022, said there were times when he went to his room and cried because of the constant criticism and the comparisons with Dhoni. "I used to really feel very bad. I used to go back to my room and cry at 20-21 years of age. Under stress, I couldn't breathe. So much pressure, and I didn't know what to do. I missed a stumping in Mohali, and the crowd started to chant 'Dhoni Dhoni'," Pant said in a 'Star Sports' series that documents his recovery from the accident. Pant, currently in recovery after suffering a life-threatening car crash in December 2022, said there were times when he went to his room and cried because of the constant criticism and the comparisons with Dhoni. "I used to really feel very bad. I used to go back to my room and cry at 20-21 years of age. Under stress, I couldn't breathe. So much pressure, and I didn't know what to do. I missed a stumping in Mohali, and the crowd started to chant 'Dhoni Dhoni'," Pant said in a 'Star Sports' series that documents his recovery from the accident. The personal relation between Dhoni and Pant however, has not been affected by this. Dhoni has always been Pant's mentor. From keeping tips to finishing skills to life skills, Dhoni has been Pant's go-to man. And that says a lot about Pant. Dhoni is not someone who spends too much time with his teammates away from the cricket field but with Pant, it is different. He is always in his birthday photographs.

# YASHASVI JAISWAL SLAMS 2ND CENTURY IN 6TH TEST, REACHES LANDMARK WITH A SIX AS INDIA TIRE OUT ENGLAND



**NEW DELHI :** Yashasvi Jaiswal made amends for his dismissal in the 80s in the previous Test, scoring a brilliant century in the second match of the series against England. Displaying a solid batting effort against the English spinners and fending off a tough challenge from veteran pacer James Anderson, Jaiswal secured his second Test century in 151 deliveries. His first three-figure score had come in his debut Test last year in July, where he scored 171 against the West Indies. India made a cautious start after expectedly opting to bat; the opener pair of Rohit Sharma and Jaiswal, both of whom were guilty of throwing their wickets away in Hyderabad, put only 40 runs in the first 16 overs. However, following Rohit's dismissal by debutant spinner Shoaib Bashir for 14, Jaiswal gradually accelerated his run-scoring. Barely using the sweep shot, Jaiswal predominantly relied on the cut shot to find the boundaries, guiding India's innings with patience and precision. Jaiswal showed great precision and patience as he methodically built his innings. By the final stages of the morning session, he had notched up a composed fifty; and even as the players returned for the afternoon session, Jaiswal's focus remained unwavering as he seamlessly transitioned into a more aggressive phase of his innings. Despite a few minor communication lapses with Shreyas Iyer between the wickets, Jaiswal remained focused on his batting. In the 42nd over, he showcased his attacking intent by confidently stepping down the track to Joe Root, dispatching the ball over the boundary ropes for a resounding six. This bold stroke signalled Jaiswal's determination to dominate the opposition, particularly against a bowler who had posed significant challenges to the Indian team in the previous Test.

# THE RETURN OF ANDERSON WILL ADD STRENGTH TO ENGLAND'S BOWLING, FEELS MANJREKAR



**NEW DELHI :** Former India-cricketer-turned-commentator Sanjay Manjrekar stated that England's veteran fast bowler James Anderson would present more challenges to the Indian batsmen in the IND vs ENG 2nd Test in Visakhapatnam than Mark Wood did in the first test. England announced their playing XI on Thursday for the IND vs ENG 2nd Test. Mark Wood who went wicketless in the first test match has been replaced by James Anderson. Manjrekar, voicing his insights, affirmed that Anderson's inclusion would bolster England's bowling prowess, citing the seamer's impressive record on Indian soil- 34 wickets from 13 matches. "There's no doubt about the fact that he will do a little better than Mark Wood, who went wicketless in the first Test. So, that actually adds to the strength of the English bowling attack," Manjrekar told ESPNcricinfo. The decision to bring in Anderson, however, was not the sole alteration to the English lineup. Spinner Jack Leach sustained a knee injury after the first test match. His injury made way for Shoaib Bashir to feature in the IND vs ENG 2nd Test. Manjrekar highlighted the relief this change would bring to Joe Root, who shouldered an extensive bowling load in the first Test, sending down 48 overs. "It is also good in a way for England as Joe Root had to shoulder the burden when he bowled 29–30 overs. Whether it had some impact on his batting is something England need to consider," Manjrekar added.

# SEEKING RELIEF FROM HEARTBURN? EFFECTIVE WAYS TO PREVENT IT



Heartburn is a common discomfort that many people experience, characterized by a burning sensation in the chest that often occurs after eating. While occasional heartburn is normal, frequent episodes can be bothersome and may indicate a more serious issue like acid reflux or gastroesophageal reflux disease (GERD). Fortunately, there are several effective ways to prevent and alleviate heartburn. By incorporating these effective strategies into your daily routine, you can take significant steps towards finding relief from heartburn and improving your overall digestive health. From maintaining a healthy weight to eating a healthy diet, here are five simple ways to prevent heartburn. Maintain a Healthy Weight : Excess weight, especially around the abdomen, can put pressure on the stomach and lead to the backward flow of stomach acid into the esophagus, causing heartburn. Adopting a healthy lifestyle that includes regular exercise and a balanced diet can help you maintain a healthy weight and reduce the risk of heartburn. Elevate Your Upper Body While Sleeping : Nighttime heartburn is a common issue for many individuals. To minimize the likelihood of acid reflux while sleeping, elevate the upper half of your body by using a wedge pillow or raising the head of your bed. This slight elevation can provide relief from nighttime heartburn. Avoid Triggering Behaviors : Certain behaviours can contribute to heartburn, such as smoking and lying down immediately after eating. Smoking can weaken the lower esophageal sphincter (LES), the muscle that separates the stomach from the esophagus, allowing stomach acid to flow back into the esophagus. Quitting smoking and adopting a habit of staying upright for at least two to three hours after eating can significantly reduce the likelihood of heartburn. Your Diet : One of the primary triggers for heartburn is the type of food you consume. Certain foods and beverages, such as spicy or acidic dishes, chocolate, citrus fruits, and caffeinated or carbonated drinks, can contribute to the onset of heartburn. To prevent it, try incorporating more alkaline foods into your diet, like bananas, melons, and leafy greens. Additionally, eating smaller, more frequent meals can help minimize the pressure on your stomach and reduce the likelihood of heartburn.

# RHEUMATOID ARTHRITIS: 5 LIFESTYLE CHANGES TO PREVENT JOINT DAMAGE

1. Balanced Diet: Maintaining a diet rich in antioxidants, omega-3 fatty acids, and anti-inflammatory foods can help prevent joint cartilage from Rheumatoid Arthritis (RA). Include fruits, vegetables, whole grains, and fish in your diet while limiting processed foods and saturated fats. 2. Regular Exercise: Dr Khatri said, "Engaging in regular physical activity helps maintain joint function and reduces the risk of RA." Incorporate low-impact exercises like walking, swimming, or yoga to enhance flexibility and strengthen muscles around the joints. Exercise also helps control body weight, which is crucial for joint health. 3. Stress Management: He added that chronic stress may worsen or trigger to the development of RA. Practicing stress-reduction techniques, such as meditation, deep breathing, or mindfulness, can positively impact the immune system and reduce inflammation, potentially lowering the risk of developing autoimmune conditions. 4. Adequate Sleep: Prioritise good sleep hygiene to support overall health and reduce inflammation. "Aim for 7-9 hours of quality sleep each night. Establish a consistent sleep schedule, create a comfortable sleep environment, and avoid stimulants like caffeine close to bedtime," the expert opined. 5. Avoiding Smoking and Limiting Alcohol: Smoking is a known risk factor for RA, and excessive alcohol consumption can also contribute to inflammation. Quitting smoking and moderating alcohol intake can significantly reduce the risk of developing RA and improve overall health. By adopting these lifestyle changes, individuals can create a foundation for joint health, mitigate inflammation, and potentially lower the risk of Rheumatoid Arthritis.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118
Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Adviser: Adv. Aniket Ghanshyam Bhankal, L.L.B., (ठाणे न्याय कक्षेत)

# घोडबंदरला मिळणार वाढीव ५ दशलक्ष लीटर पाणी, महापालिकेने केला स्टेमकडे पत्रव्यवहार

**■ठाणे। प्रतिनिधी,**
घोडबंदरच्या पाण्याच्या मुद्यावरुन मागील काही दिवसापासून पुन्हा एकदा रान पेटले आहे. येथील नागरीकांना पाण्याच्या समस्या मांडल्यानंतर भाजप आणि शिवसेनेच्या आमदारांनी देखील वाढीव पाण्याची मागणी केली होती. अखेर ठाणे महापालिकेने घोडबंदरला वाढीव ५ दशलक्ष लीटर पाणी मिळावे यासाठी स्टेम प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार केला आहे. हे वाढीव पाणी मिळण्यास एक महिन्यांचा कालावधी जाणार असल्याचे पालिकेच्या सुत्रांनी सांगितले. परंतु हे वाढीव पाच दशलक्ष




लीटर पाणी घोडबंदरला पुरेसे ठरणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

ठाणे महापालिका क्षेत्रात चार स्त्रोतांमार्फत दररोज ५८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यात महापालिकेच्या स्वतःच्या योजनेतून २५० दशलक्षलीटर, स्टेम प्राधिकरणाकडून ११५ दशलक्षलीटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्षलीटर आणि मुंबई महापालिकेकडून ८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. परंतु असे असले तरी आजही ठाण्यातील अनेक भागांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यात घोडबंदर भागाला तर याची झळ अधिक बसत आहे. या भागाला कमी पाणी पुरवठा होत असल्याने त्याचा फायदा टँकर माफीया घेत आहेत. त्यामुळे अनेक सोसायटींना टँकरचेच बिल महिनाकाठी ४ ते ५ लाख जात आहे. त्यामुळेच महापालिका आयुक्तांनी घेतलेल्या पाण्या संदर्भातील पहिल्या बैठकीत घोडबंदरचा पाणी प्रश्न चांगलाच पेटल्याचे दिसून आले. घोडबंदरला पाणी वाढविण्याची मागणी येथील नागरीकांनी केली आहे. तर भाजपचे आमदार संजय केळकर यांनी घोडबंदरला वाढीव १० दशलक्ष लीटर पाणी पुरवठा वाढवून मिळावा अशी मागणी केली आहे. तर स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांनी या भागाला १०० एमएलडी पाणी दिले तरी कमी पडणार असल्याची भुमिका विषद केली आहे. त्यात आता माजी खासदार संजीव नाईक यांनी याच मुद्यावरुन महापालिका आयुक्तांची भेट घेत वाढीव पाण्याची मागणी केली आहे. घोडबंदर भागाची लोकसंख्या सद्यस्थितीला ५ ते ७ लाखांच्या वर गेली आहे. या भागाला सध्या प्रतीदिन ११० दशलक्ष लीटर पाणी पुरवठा केला जात आहे. परंतु तो देखील अपुरा पडत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता महापालिकेने या भागाला वाढीव ५ दशलक्ष लीटर मिळावे यासाठी स्टेम प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार केला आहे.

# मालगाडीवर चढून ओव्हर हेड वायरचा धक्का लागून मुलगा गंभीर जखमी, कल्याण रेल्वे याडार्तील घटना

**■कल्याण । प्रतिनिधी,**
येथील पूर्व भागातील मालगाड्यांचा थांबा असलेल्या ठिकाणी खेळण्यासाठी आलेला एका १३ वषार्चा मुलगा मंगळवारी दुपारी खेळताना याडार्तील एका मालगाडीवर चढला. वरील ओव्हर हेड वायरशी त्याचा संपर्क आल्याने त्याला विजेचा जोराचा धक्का बसून तो गंभीर जखमी झाला. त्याच्यावर मुंबईतील शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत.



खडेगोळवली भागात राहणारा समीर बेग (१३) हा मुलगा शाळा सुटल्यावर घरी आला. आपण कबड्डी खेळण्यास जात आहे असे सांगून तो रेल्वे यार्डात आला. तेथे मालगाड्या थांबलेल्या होत्या. एका मालगाडीच्या टपावर समीर चढला. जिवंत ओव्हर हेड वायरशी त्याचा संपर्क आल्याने त्याला विजेचा जोरदार धक्का बसून तो जागीच कोसळला. तो ८० टक्के होरपळला आहे. लोहमार्ग पोलिसांना ही माहिती मिळताच त्याला पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात नेण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने मुंबईत हलविण्यात आले. कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे. रेल्वे यार्ड भागात रेल्वे सुरक्षा बळाचे जवान तैनात असतात. तरीही त्यांची नजर चुकवून समीर यार्डात आला कसा, असा प्रश्न पोलिसांना पडला आहे.

# उरण लोकल मार्गावरील स्थानकांत गैरसोयी

**■उरण। प्रतिनिधी,**
नेरुळ/ बेलापूर मार्गाला उरणच्या प्रवाशांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. मात्र येथील खारकोपरदरम्यानच्या उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा व शेमटीखार या चारही स्थानकांत अनेक असुविधांचा सामना करावा लागत आहे. येथील अपूर्ण कामांमुळे नागरिकांनी सुविधा पुरविण्याची मागणी केली आहे. उरण ते नेरुळ आणि बेलापूर लोकल मार्गावरील रेल्वे स्थानकात प्रवाशांना अनेक असुविधांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.




प्रवाशांच्या सुविधा तातडीने उपलब्ध कराव्यात अशी मागणी प्रवासी आणि नागरिकांकडून केली जात आहे. यामध्ये उरण स्थानकात स्वच्छतागृहाची व्यवस्था नाही. स्थानकाच्या पूर्वेला प्रवेश करण्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. तर द्रोणागिरी स्थानक हे बोकडवीरा गावाच्या हद्दीत आणि गावालगत असतानाही बोकडवीरा गावातील प्रवाशांना स्थानकात जाण्यासाठी मार्गच उपलब्ध नाही. पुढील न्हावा शेवा (नवघर) स्थानकाच्या पश्चिमेला जाण्यासाठी असलेला मार्ग नादुरुस्त आहे.

सिडकोच्या सेक्टर ११ मधून जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे आहेत. तर पूर्वेला तिकीट घर नसल्याने प्रवाशांना पागोटे, द्रोणागिरी, नवघर, भेंडखळ तसेच खोपटे खाडीपलीकडील गावातील प्रवाशांना जिने चढून यावे-जावे लागत आहे.

या स्थानकांत बसविण्यात आलेले सरकते जिने बंद आहेत. याचा फटका ज्येष्ठ नागरिकांना बसत आहे. अशीच स्थिती शेमटीखार (रांजणपाडा) या दोन्ही स्थानकांत प्रवाशांना पायऱ्या चढून फलाटावर जावे लागत आहे. अपुऱ्या सुविधांची माहिती घेऊन अपूर्ण कामांसंबंधी त्या त्या विभागाला कळविण्यात येणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी पी. डी. पाटील यांनी दिली.

# लोखंडी पिंजरे काढून झाडांनी घेतला मोकळा श्वास

**■ठाणे। प्रतिनिधी,**
ठाणे महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाच्या माध्यमातून आता झाडांभोवती लावण्यात आलेले कुंपण काढण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार माजिवडा - मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत घेण्यात आलेल्या विशेष मोहीमेत १६५ झाडांच्या खोडाभोवती असलेले लोखंडी पिंजरे काढून झाले मुक्त करण्यात आली आहेत. झाडा भोवती लावण्यात आलेल्या लोंखडी कुंपणांमुळे किंवा जाळ्यांमुळे वृक्ष वाढीला बाधा येत असते. तसेच काही वेळेस वृक्ष उन्मळून पडण्याच्या घटना देखील घडत असतात.




त्यामुळे याच्या विरोधात काही दक्ष नागरीकांनी आवाज उठविला होता.

अखेर ठाणे महापालिकेने झाडांभोवती लावण्यात आलेल्या लोखंडी कुंपणे, जाळ्या काढण्याचे काम हाती घेतले आहे. त्यानुसार माजिवडा - मानपाडा प्रभाग समितीत विशेष मोहीम महापालिकेने हाती घेतली होती. त्यात १६५ झाडांसभोवती असलेले लोखंडी पिंजरे (ट्री गार्ड) कटरच्या सहाय्याने झाडांना कोणतीही इजा न होऊ देता काढण्यात आले. वृक्षप्राधिकरणातर्फे ही मोहीम राबविण्यात आली. कापूरबावडी ते गायमूख (घोडबंदर रस्ता डावी बाजू) - ३२, गायमुख ते कापूरबावडी (घोडबंदर रस्ता उजवी बाजू) - ७८ ,बाळ्कूम - साकेत रोड झ ५५ , एकुण १६५ झाडांच्या खोडाभोवती असलेले लोखंडी पिंजरे काढून झाडे मुक्त करण्यात आली.

# बलात्कारानंतर पीडितेला ब्लॅकमेल करणाऱ्या आरोपीला दिला चोप; नौपाडा पोलिसांनी केली अटक

**■ठाणे। प्रतिनिधी,**
मैत्रीच्या नावाखाली ठाण्यातील एका ४२ वर्षीय विवाहितेवर बलात्कार करून तिला ब्लॅकमेल व मारहाण करणारा राकेश दामोदर साधवानी (३२, रा. उल्हासनगर) या आरोपीला ठाण्यातील काही नागरिकांनी ठाण्याच्या जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या आवारात चांगलाच चोप दिला.

त्यानंतर त्याला नौपाडा पोलिसांच्या हवाली केले. या आरोपीला अटक केल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र क्षीरसागर यांनी गुरुवारी दिली. ठाण्यात राहणारी ही महिला उल्हासनगरमध्ये नोकरीला आहे. तिथेच राकेशबरोबर पीडितेची





ओळख झाली. सुरुवातीला त्याने तिच्याबरोबर मैत्रीचा बहाणा केला. त्यानंतर त्याने तिच्यावर बलात्कार केला.

त्याच्या या अत्याचाराला तिने तीव्र विरोध केल्यानंतर त्याने तिचे अश्लील फोटो तिचा पती आणि मुलाला पाठविले व तिला मारहाण केली. या सर्वच प्रकाराला कंटाळून तिने काही दिवसांपूर्वी आत्महत्येचा प्रयत्न केला.

तिच्या पतीने तिला विश्वासात घेत राकेशविरुद्ध अखेर १ फेब्रुवारी २०२४ रोजी बलात्कार, विनयभंग आणि मारहाण तसेच धमकी देण्याचा गुन्हा दाखल केला. या प्रकारानंतरही राकेश ठाणे जिल्हा रुग्णालय परिसरात मोकाट फिरत असल्याचे ठाण्यातील काही नागरिकांना दिसले. या नागरिकांसह भारतीय मराठा महासंघाचे ठाणे शहराध्यक्ष महेश मोरे तसेच इतरांनी त्याला गुरुवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास चांगलाच चोप दिला. त्यानंतर नागरिकांनीच त्याला नौपाडा पोलिसांच्या स्वाधीन केले.

# खारघर येथील महाराष्ट्र भूषण सोहळ्यातील हलगर्जीपणाबाबतच्या याचिकेची सूनावणी पुढील तारखेला



**■पनवेल। प्रतिनिधी,**
खारघर येथे झालेल्या महाराष्ट्र भूषण सोहळ्यामध्ये आयोजकांच्या हलगर्जीपणाविरोधात पनवेल न्यायालयात शुक्रवारी या प्रकरणाचे कामकाज चालविले गेले. याचिकाकर्त्यांतर्फे अॅड असिम सरोदे यांनी न्यायालयात बाजू मांडली. या प्रकरणातील महत्वाचे कागदपत्रे आज न्यायालयासमोर सादर करण्यात आली. यामध्ये पुरावा कायद्याचे कलम ६५ (ब) तज्ज्ञांकडून मिळालेले प्रमाणपत्र न्यायालयात दाखल करण्यात आल्याची माहिती अॅड सरोदे यांनी दिली.

खारघर येथील महाराष्ट्र भूषण सोहळ्यातील चेंगराचेंगरीमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणातील पुरावा कायदा प्रमाणपत्रामध्ये महत्वाचे मुद्दे मांडण्यात आले आहेत. यामध्ये अप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिला त्यावेळेस झालेली चेंगराचेंगरीमध्ये निर्दोष नागरिकांचे प्राण गेले. राजकीय कारणासाठी अशाप्रकारे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करुन संपुर्ण अव्यवस्थापनात हा कार्यक्रम करण्यात आला. पिण्याच्या पाण्यासह वैद्यकीय व्यवस्था अपुरी असणे या सर्वबाबी या प्रकरणात मांडण्यात आल्याची माहिती अॅड. सरोदे यांनी प्रसारमाध्यमांना पनवेल येथे सांगीतले. या प्रकरणात सोहळ्याचे आयोजक हे आरोपी आहेत. तसेच हे आयोजक म्हणजेच शासनाचे उच्चपदस्थ अधिकारी असल्याने सरकारी अधिका-यांविरोधात हे प्रकरण न्यायालयात चालविण्यासाठी सरकारची परवानगी मिळावी यासाठी अर्ज केला आहे.

# मध्य रेल्वे आणि महापालिकेच्या वाहनतळात कंत्राटदारांकडून लुबाडणूक सुरूच

**■ठाणे। प्रतिनिधी,**
ठाणे रेल्वे स्थानक परिसरात प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्यांची वाहने उभी करता यावीत यासाठी मध्य रेल्वेने ठाणे स्थानकाच्या पश्चिमेला आणि महापालिकेने गावदेवी मैदानाखाली भूमीगत वाहन तळ उभारले आहे. नियमानुसार या वाहनतळामध्ये दुचाकी उभी करण्यासाठी दोन तासांचे १० रुपये तर ६ ते १२ तासांचे ३० रुपये आकारणे अपेक्षित आहे. परंतु गेल्याकाही महिन्यांपासून वाहन तळामध्ये प्रवासी आणि वाहन चालकांकडून सर्रास लुबाडणूक सुरू आहे. मध्य रेल्वेच्या ठाणे स्थानकातील अधिकाऱ्यांना याबाबत माहिती असतानाही त्यांच्याकडून कठोर कारवाई केली जात नसल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. महापालिकेच्या वाहनतळामध्ये देखील अशीच परिस्थिती आहे.



ठाणे रेल्वे स्थानक परिसरात दररोज हजारो प्रवासी तसेच कामानिमित्ताने चालक वाहने घेऊन येत असतात. या वाहन चालकांना त्यांची वाहने वाहन तळात उभी करता यावी यासाठी रेल्वे प्रशासनाने काही वर्षांपूर्वी ठाणे रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेला फलाट क्रमांक एकजवळ वाहन तळ उभारले आहे. या वाहन तळाचे कंत्राट एका कंत्राटदाराला देण्यात आला आहे. नियमानुसार, दुचाकी उभी करण्यासाठी दोन तासांपर्यंत १० रुपये, दोन ते सहा तासांसाठी २० रुपये, ६ ते १२ तासांसाठी ३० रुपये आणि १२ तासांहून अधिक वेळ वाहन उभे केल्यास ४० रुपये आकारणे अपेक्षित आहे. असे असतानाही एक ते दोन तासांसाठी देखील वाहन चालकांकडून ३० रुपये आकारण्यात येत आहे. या वाहन तळामध्ये वाहने पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावरून वाहन खाली उतरविण्यासाठी एक उतार तयार करण्यात आला आहे.

या उतारावर देखील एका दिशेला नियमबाह्य पद्धतीने वाहने उभी केली जात आहे. ठाणे महापालिकेने देखील गावदेवी मैदानाखाली ४ हजार ३३० चौ. मीटर इतके प्रशस्त भूमिगत वाहनतळ उभारले आहे. या वाहन तळात एकाचवेळी शेकडो वाहने उभी राहू शकतात इतकी या वाहन तळाची क्षमता आहे. याठिकाणी देखील ठेकेदाराकडून अशाचपद्धतीने एक तास किंवा त्याहून कमी कालावधीसाठी ३० रुपये आकारले जात आहे. या प्रकाराबाबत समाजमाध्यमावर तक्रारी करूनही कठोर कारवाई केली जात नसल्याचे चालकांचे म्हणणे आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांना विचारले असता, लेखी तक्रार आल्यास कारवाई करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

# कल्याण-डोंबिवली शहरे वाहन कोंडी मुक्त करण्यासाठी प्रभावी उपाय करा; आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या वाहतूक पोलिसांना सूचना

**■कल्याण। प्रतिनिधी,**
कल्याण, डोंबिवली शहरे वाहतूककोंडी मुक्त करण्यासाठी प्रभावी उपाय योजना करा. तसेच, रेल्वे स्थानक परिसर पादचाऱ्यांना चालण्यासाठी मोकळे असावेत या दृष्टीने नियोजन करा, अशा सूचना कल्याण डोंबिवली पालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी उच्चपदस्थ वाहतूक आणि पोलीस अधिकाऱ्यांना नुकत्याच झालेल्या बैठकीत केल्या आहेत. वाहतूककोंडी मुक्त उपाय योजनांसाठी पोलिसांना पालिका प्रशासन पूर्ण सहकार्य करील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त



केला. कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील वाहतूक कोंडी, रेल्वे स्थानक परिसरातील वाढती गर्दी आणि त्या ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीचा विचार करून तेथील रस्ते नागरिकांना केवळ चालण्यासाठी उपलब्ध झाले पाहिजेत. रेल्वे स्थानक परिसर कोंडी मुक्त असला पाहिजे, या उद्देशातून आयुक्त डॉ. जाखड यांनी वाहतूक पोलिसांसोबत बैठक घेतली. या बैठकीला पालिकेचे अतिरिक्त आयुक्त मंगेश चितळे, पोलीस उपायुक्त सचीन गुंजाळ, वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड, रेल्वे, उपप्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत शहरातील दर्शक यंत्रणा, वाहनतळ सुविधा, मोकळे पदपथ, रस्ते या विषयांवर चर्चा झाली.

# खारघरमध्ये दुपारी तीन तासांत पावणेचार लाखांची घरफोडी

**■पनवेल। प्रतिनिधी,**
खारघर वसाहतीमधील चोऱ्यांचे प्रमाण कमी होत नाही. पोलीसांचे अपुरे मनुष्यबळ हे एक कारण आहेच. मात्र पोलीसांपेक्षा चोरांची बंद घरांवर टेहळणी करणारी टोळी अधिक सक्रीय झाल्याचे उजेडात येत आहे. खारघरमधील सेक्टर १९ येथील सिद्धिविनायक



सोसायटीमध्ये गुरुवारी दुपारी सव्वादोन वाजता ते सव्वापाच वाजण्याच्या दरम्यान एका बंद घरात शिरुन चोरट्यांनी सोनेचांदीचे दागीने व रोखड लंपास केली. संदीप पटेल यांच्या घरात ही चोरी झाली असून पटेल यांनी खारघर पोलीसांना दिलेल्या तक्रारीनूसार घरात कोणीही नसताना गुरुवारी दुपारी चोरट्यांनी घराच्या सूरक्षा दरवाजाची कडी तोडून मुख्य दरवाजाचे कुलुप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटातील सोन्याचे दागीने व रोख रक्कम चोरुन नेली. तब्बल पावणेचार लाख रुपयांची या घरफोडीतील आरोपींना शोधण्यासाठी खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजीव शेजवळ यांनी खास पथक नेमले आहे.

# कल्याण-डोंबिवलीतील ४९१ रस्ते बाधितांना झोपु योजनेत घरे मिळण्याचा मार्ग मोकळा



**■कल्याण। प्रतिनिधी,**
रस्ते, विकास प्रकल्पांसाठी जागा देणाऱ्या बाधित ४९१ रहिवाशांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत घरे देण्याचा निर्णय कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने घेतला आहे. मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला हा विषय मार्गी लागल्याने लाभार्थींनी समाधान व्यक्त केले आहे. ८ फेब्रुवारी रोजी कल्याणमधील आचार्य अत्रे रंगमंदिरात घरे वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पारदर्शक पद्धतीने हा कार्यक्रम पार पडेल. पात्र लाभार्थींनी त्यांना केलेल्या सूचनेप्रमाणे आवश्यक मूळ कागदपत्रे घेऊन उपस्थित राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. मागील २५ वर्षांच्या कालावधीत कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत रस्ता रुंदीकरण, नागरी सुविधा प्रकल्प आणि इतर विकास कामांसाठी पालिकेने नागरिकांकडून जागा हस्तांतरित केल्या आहेत. काही रहिवासी या प्रकल्पात बाधित झाले आहेत. अशा बाधितांना घरे देण्याची हमी प्रशासनाने वेळोवेळी बाधितांना दिली आहे. पालिकेच्या १० प्रभाग स्तरावरून एकूण ६६२ रस्ते बाधितांचे प्रस्ताव पालिका मुख्यालयात प्राप्त झाले होते. पुनर्वसन समितीने या सर्व प्रस्तावांची पडताळणी केली.

त्यामधील ४८ जणांनी योग्य माहिती न दिल्याने त्यांचे प्रस्ताव फेटाळून लावून त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. १२३ जणांनी आवश्यक कागदपत्रे जमा केली नाहीत. या अपूर्णतेबद्दल त्यांचे प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. १२३ जणांनी विहित वेळेत पालिकेला त्यांची अपूर्ण कागदपत्रे जमा केली तर त्यांच्या बाबतीत पुनर्वसन समिती तातडीने निर्णय घेणार आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. पुनर्वसन समितीने पात्र केलेल्या लाभार्थींची यादी प्रभाग क्षेत्र कार्यालये, पालिका मुख्यालय, मालमत्ता विभागांच्या सूचना फलकावर लावण्यात आली आहे.

# ठाण्यातील पोलिस अधिकाऱ्यांचे खांदेपालट; चार उपायुक्तांसह नउ सहायक आयुक्त




**■ठाणे। प्रतिनिधी,**
आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पोलीस दलात बदल्यांचे वारे सुरु आहे. ठाण्याचे सह पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे यांच्यासह १७ निरीक्षकांची आयुक्तालयाच्या बाहेर बदली झाली आहे.

त्यापाठोपाठ आता ठाणे शहर पोलिस आयुक्तालयातील विशेष शाखेचे पोलिस उपायुक्त श्रीकांत परोपकारी, ठाण्याचे गणेश गावडे, भिवंडीचे नवनाथ ढवळे आणि मुख्यालयाचे सुभाषचंद्र बुरसे या चार उपायुक्तांसह नउ सहाय्यक आयुक्त आणि ३४ निरीक्षक अशा ४७ अधिकाऱ्यांच्या आयुक्तालयांतर्गत पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी बदल्या करुन खांदेपालट केले आहे.

पोलिस आयुक्त डुंबरे यांच्या आदेशानुसार ठाणे शहर परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त गणेश गावडे यांना विशेष शाखेत आणण्यात आले आहे. तर विशेष शाखेचे उपायुक्त डॉ श्रीकांत परोपकारी यांना भिवडी परिमंडळ २ मध्ये संधी मिळाली आहे. भिवंडीच्या नवनाथ ढवळे यांची मुख्यालय २ मध्ये बदली झाली आहे. तर मुख्यालयाचे सुभाषचंद्र बुरसे यांना ठाणे परिमंडळ१ मध्ये संधी देण्यात आली आहे.


त्याच बरोबर भिवंडी पूर्व विभागाचे सहायक पोलीस आयुक्त किशोर खैरनार यांची विशेष शाखा २ येथे तर वर्तकनगर विभागाचे सहाय्यक आयुक्त अनिल देशमुख यांची आर्थिक गुन्हे शाखेत, कळवा विभागाचे विजयसिंह भोसले यांची ठाणे शहर वाहतूक शाखेत, आर्थिक गुन्हे शाखेचे उत्तम कोळेकर यांची कळवा विभागात बदली झाली आहे. विशेष शाखा २ चे सहाय्यक पोलीस आयुक्त अनिल वाघमारे यांची भिवंडी वाहतूक शाखेत, भिवंडी वाहतूक शाखेचे मंदार जवळे यांची वर्तकनगर विभागात बदली झाली आहे. नियंत्रण कक्षाच्या संजय साबळे यांची कल्याण वाहतूक शाखेत, विशेष शाखा ३ चे सहायक आयुक्त सिद्धार्थ गाडे यांची भिवंडी पूर्व विभागात बदली झाली असून मुख्यालय १ च्या सहाय्यक आयुक्त ममता डिसोजा यांची विशेष शाखा ३ येथे बदली करण्यात आली आहे.

याशिवाय, नौपाडयाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र क्षीरसागर यांची वाहतूक शाखेत, कळव्याचे कन्हैया थोरात आणि निवृत्ती कोल्हटकर यांची गुन्हे शाखेत बदली झाली आहे. यासह आयुक्तालयातील ३४ निरीक्षकांचा या बदल्यांमध्ये समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# कळंबोलीच्या लोखंड बाजारात चोरीचे सत्र सूरुच; ७ लाख ३३ हजारांचा स्टेनलेस स्टील गोदाम फोडून लुटले

**■पनवेल। प्रतिनिधी,**
कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारात चोरीचे सत्र सूरुच आहे. गुरुवारी कळंबोली पोलीस ठाण्यात लोखंड बाजारातील गोदाम क्रमांक१९२८ मध्ये ७ लाख ३३ हजार रुपयांचे स्टेनलेस स्टील चोरीला गेल्याची तक्रार व्यापा-यांनी नोंदविली. ही चोरी २५ डिसेंबर ते ९ जानेवारी या दरम्यानमध्ये झाली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी बाजारातील वाढत्या चो-या रोखण्यासाठी स्वता बाजाराच्या स्थितीची पाहणी केल्यानंतर १०० सीसीटिव्ही




कॅमेरे लावण्याचे बाजार समितीला सूचविले. सध्या सीसीटिव्ही कॅमेरे लावण्याचे काम सूरु असले तरी रात्रीच्या वेळी रस्त्यावरील पथदिव्यांची विज घालवून गोदामे फोडणारी टोळी बाजारात सक्रीय आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक लोखंड व पोलाद खरेदीविक्रीची उलाढाल कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारात होते.

हा बाजार मात्र असूरक्षित आहे. बाजारातील असुविधांमुळे व्यापारी त्रस्त झाले आहेत. पथदिवे बंद असणे, पोलीसांची गस्त अपुरी आणि सीसीटिव्ही कॅमरा नसने हे सारे चोरट्यांसाठी पोषक वातावरण आहे. चोरीच्या तक्रारींसाठी पोलीस ठाण्यात व्यापारी किंवा त्यांचे प्रतिनिधी गेल्यावर त्यांनाच मालाची पावती दाखवा, सीसीटिव्ही लावले का, रखवालदार का नेमले नाही अशा प्रश्नांना सामोरे जावे लागते.

# मिरा रोडमध्ये घरात गॅस सिलेंडरचा स्फोट

**■भाईंदरे। प्रतिनिधी,**
मिरा रोड मध्ये एका घरात झालेल्या सिलेंडरच्या स्फोटात एक जण गंभीर जखमी झाला आहे. गुरुवारी रात्री ही दुर्घटना



घडली.मिरा रोड येथील रामदेव पार्क परिसरात असलेल्या राम कृपा इमारतीच्या तळ मजल्यावर हा प्रकार घडला आहे. गुरुवारी रात्री दहाच्या सुमारास घरात असलेल्या सिलेंडरचा स्फोट झाला.यामुळेप्रचंड मोठा आवाज होऊन अवती-भवती असलेल्या इमारती मधील काचा फुटल्या. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाने धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवले. या दुर्घटनेत संजय नामक तरुण जखमी झाला असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काही महिन्यापूर्वीच ही खोली भाड्यावर देण्यात आली होती.घरात स्फोट झालेल्या सिलेंडर व्यतिरिक्त इतर व्यावसायिक ५ सिलेंडर आढळून आले आहे.

# पनवेलकरांचा पाणीप्रश्न सुटण्याची चिन्हे
## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तातडीने प्रश्न सोडवण्याचे यंत्रणांना आदेश



**■पनवेल। प्रतिनिधी,**
लोकसभा निवडणूकीच्या काळापूर्वी पनवेलकरांना पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी भाजपच्या आमदारांनी पाठपुरावा केल्याने उपमुख्यमंत्र्यांनी मंगळवारी सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीमध्ये महत्त्वाचे आदेश पाणीपुरवठा करणाऱ्या विविध सरकारी यंत्रणांना दिले आहेत. त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यात पनवेलकरांचा पिण्याच्या पाण्याबाबत दिलासा मिळेल अशी चिन्हे आहेत.

सर्व प्रक्रियेत तात्काळ कार्यवाही होण्यासाठी पाणी पुरवठ्यातील अडचणी लवकरात लवकर दूर करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. येत्या उन्हाळ्यात पनवेलमधील रहिवाशांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तात्काळ नवीन पंप यंत्रणा कार्यान्वित करून फेब्रुवारी अखेरपर्यंत प्रतिदिन २५ दशलक्ष लिटर पाणी वाढवून पनवेलकरांना देण्याची कार्यवाही करण्याची सूचना उपमुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या आहेत. उपमुख्यमंत्र्यांच्या या सूचनांमुळे यंदा लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी पनवेलकरांची पाणी समस्या दूर होण्यासाठी प्रशासन कामाला लागल्याचे बोलले जात आहे. सहा वर्षांपूर्वी पनवेल महानगरपालिकेची स्थापना झाली असली तरी अजूनही पनवेल महापालिकेला पाण्यासाठी सिडको, एमआयडीसी, जलसंपदा विभाग, नवी मुंबई महापालिका या प्रशासनांवर अवलंबून राहावे लागते. पाणीपुरवठा करणा-या प्रशासनांकडून दिरंगाई झाल्यास रहिवाशांना त्याचा सर्वात जास्त त्रास सहन करावा लागतो. पनवेल महापालिकेचे पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतःचा असा पूर्ण क्षमतेचा स्वतंत्र जलस्त्रोत नसल्याने पनवेल महापालिकेसाठी पाण्याचे स्वतंत्र आरक्षण करावे यासाठी पालिकेने जलसंपदा विभागाकडे लेखी पत्राव्दारे व प्रस्तावाने मागणी केली आहे. यावर कोणताही निर्णय न झाल्याने भविष्यातील पनवेलकरांसमोर पाणी प्रश्न कायम आहे.

सद्यास्थितीतील पाण्याची तूट भरून काढण्याकरिता पाताळगंगा नदीतून तातडीने प्रतिदिन १० दशलक्ष लिटर पाणी आरक्षण मिळण्याचा प्रस्ताव कोकण पाटबंधारे विभाग जलसंपदा कार्यकारी संचालक यांच्या कार्यालयाकडे मुख्य अभियंता जलसंपदा विभाग कार्यालयाकडून सादर करण्यात आला आहे. तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील भविष्यातील पाण्याचे नियोजन करण्यासाठी जलसंपदा विभागाच्या कोलाड येथील डोलवाल बंधाऱ्यातून प्रतिदिन ५०० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी आरक्षणाचा प्रस्ताव कोकण पाटबंधारे विभाग जलसंपदा कार्यकारी संचालक यांच्या कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने पनवेल पालिका अंतर्गत पाणीटंचाई कमी होण्याच्या दृष्टिकोनातून तातडीने अंमलबजावणी करण्याची आग्रही मागणी आ. ठाकूर यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे या बैठकीत केली. तसेच नवी मुंबई महापालिकेकडून पनवेल महानगरपालिका क्षेत्राला व शेजारील गावांना सुद्धा आवश्यकतेप्रमाणे पाण्याची जोडणी दिली पाहिजे, अशी मागणी आ. ठाकूर यांनी केली.

# नकली नोटा छापण्याच्या ३ मशीन, ४१ लाखांच्या २ महागड्या कार अन् १९ लाख कॅश जप्त



**■बुलढाणा। प्रतिनिधी,**
मलकापूर येथील बहुचर्चित जग्गु डॉन शेतकरी फसवणूक प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथक( एसआयटी) गठीत करण्यात आले आहे. याप्रकरणात आजअखेर ८२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. फसवणुकीतून मुख्य आरोपी जगन रामचंद्र नारखेडे उर्फ जग्गु डॉन याने कोट्यवधी रुपये किंमतीची मालमत्ता खरेदी आणि गुंतवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांनी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात प्रसिद्धी माध्यमासोबत बोलताना ही खळबळजनक माहिती दिली. घटनेचा प्राथमिक तपास पोलीस उप निरीक्षक रोकडे यांनी केला. मात्र घटनेचे गांभीर्य, गुंतागुंत, फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांची संख्या, फसवणुकीतून झालेले व्यवहार लक्षात घेता तपासासाठी एसआयटी गठीत करण्यात आली आहे. आज अखेरच्या तपासात, २० लाखांच्या नकली नोटा छापण्याच्या ३ मशिन, ४१ लाखांच्या २ महागड्या कार, १९ लाख रुपये रोख जप्त करण्यात आल्याचे कडासने यांनी सांगितले. दुसरीकडे मुख्य आरोपी जग्गु याने शेतकऱ्यांच्या फसवणूक मधून मिळालेल्या पैशातून राहत्या गावी (भालेगाव ता. मलकापूर) येथे ७० लाख रुपयांची ४ एकर जमीन, मलकापूर मध्ये २७ लाखांचा फ्लॅट, २३ लाखांचे गाळे ( दुकाने) खरेदी केले.

# रेल्वे लोक आंदोलन समितीचा 'सत्याग्रह' दुर्लक्षित; तिघांनी काळे फासून घेत केला निषेध, सत्ताधाऱ्यांना काळे फासण्याचा इशारा



**■बुलढाणा। प्रतिनिधी,**
जिल्हा रेल्वे लोक आंदोलन समितीच्यावतीने चिखली येथे १२ जानेवारीपासून सुरू असलेल्या सत्याग्रह आंदोलनाकडे शासन व सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष कायम आहे. याचा निषेध म्हणून तीन पदाधिकाऱ्यांनी स्वतःच्या तोंडाला काळे फासून घेत अभिनव पद्धतीने निषेध व्यक्त केला. खामगाव जालना रेल्वे मार्गाकरिता राज्य शासनाने ५० टक्के निधीला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता द्यावी यासाठी चिखली तहसील कार्यालयासमोर सत्याग्रह आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनाला २१ दिवस झाले असून शासनाने अद्यापही या आंदोलनाची दखल घेतली नाही. त्यामुळे आंदोलनाला पाठिंबा व शासनाचा निषेध म्हणून शिवसेनेचे ( शिंदे गट) उपजिल्हा प्रमुख संतोष भुतेकर , स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विनायक सरनाईक, बाजार समितीचे संचालक नितीन राजपूत, यांनी स्वतःच्या तोंडाला काळे फासत अनोखे आंदोलन केले. १३ जानेवारी रोजी चिखली येथील सभेमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खामगाव जालना रेल्वे मार्गासाठी राज्य शासन ५० टक्के निधी देईल अशी घोषणा केली. मात्र मंत्रिमंडळ बैठकीत कोणताच ठराव घेण्यात आला नाही. त्यामुळे रेल्वे लोक आंदोलन समितीच्या वतीने चिखली येथील तहसील कार्यालयासमोर सत्याग्रह व साखळी उपोषण करण्यात येत आहे. या आंदोलनाला विविध राजकीय पक्ष, संघटना, सामाजिक संघटना, व्यापारी संघटना, वकील संघ यांचा पाठींबा वाढत आहे. मात्र सत्ताधारी पक्षाच्या एकही लोकप्रतिनिधी आंदोलन स्थळी आला नाही. त्यामुळे या युवकांनी स्वतःच्या तोंडाला काळे फासत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. दरम्यान आज स्वतःला काळे फासले असून आंदोलन दुर्लक्षित राहिले तर आम्ही सत्ताधारी लोकप्रतिनिधी, मंत्री व पालकमंत्री यांच्या तोंडाला देखील काळे फासण्याचा मागे पुढे बघणार नाही असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

# स्वप्नातल्या पालकमंत्र्यांनी जॅकेट शिवलं, जुनं झालं; नवे नॅपकिन घेतले, घामाने भिजले; ठाकरे गोगावलेंवर बरसले



**■रायगड। प्रतिनिधी,**
आज मंत्री होणार, उद्या मंत्री होणार, परवा मंत्री होणार, स्वप्नातले पालकमंत्री... नवीन जॅकेट शिवलं, ते जॅकेट घातलं, ते जुनं झालं, नवनवीन नॅपकिन घेतले, तेही घामाने भिजले, पण मंत्रीपद काही मिळतच नाही, अशा शब्दात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाडचे आमदार भरत गोगवले यांचा समाचार घेतला आहे. या रायगडमध्ये शूरवीर जन्माला आले, निष्ठावंत जन्माला आले, त्याच रायगड जिल्ह्यामध्ये रायगड किल्ल्यावरती गद्दारांना दाखवलं जाणारं टकमक टोक आहे, म्हणून या जिल्ह्याचे नाव आहे, असा इशारा ठाकरेंनी गद्दारांचे नाव घेत विरोधकांना दिला आहे. हा जनसंवाद नाहीत तर मी माझ्या कुटुंबाच्या जवळ हा संवाद साधतोय. हे सगळं माझं कुटुंब आहे. करोना कालावधीत माझे कुटुंब माझी जबाबदारी ही मोहीम मी या सगळ्या आपल्या कुटुंबासाठी राबवली होती. काही जणांना यावरूनसुद्धा पोटदुखी आहे. तुम्ही सगळे मला महाराष्ट्रातील जनता आपल्या कुटुंबातील सदस्य मानता तर काही जणांना दारोदारी जाऊन सुद्धा सगळे म्हणतात 'हड' अशी विरोधकांची खिल्ली उडवत, 'सरकार आपल्या दारी, लोक सांगतात जा तुज्या घरी' अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी रायगड जिल्ह्यातील पोलादपूर येथील सभेत राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. रायगडचं वारं असं फिरलं नाही तर रायगडाच्या वाऱ्याने मोठमोठे सरकारला झोपवले आहे. दिल्लीला, आग्र्याला झुकवणारा हा रायगड आहे, असा शब्दात रायगडचं कौतुक करत ही भूमी नरवीर तानाजी मालुसरेंची आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आम्ही भगवा फडकवणारच पण या भूमीत आता झेंडा राहिला बाजूला आणि नॅपकिन फडकवणारेच खूप झाले, अशा शब्दात महाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार भरत गोगावले यांच्यावर त्यांनी निशाणा साधला आहे.

# शरीर संबंधास नकार; महिलेच्या अंगावर पेट्रोल ओतून तिला पेटवून देण्याचा प्रयत्न




**■बारामती। प्रतिनिधी,**
शरीरसंबंधाला नकार देणाऱ्या महिलेच्या अंगावर पेट्रोल ओतून तिला पेटवून देण्याचा प्रकार बारामतीत घडला. या घटनेत संबंधित महिला गंभीर जखमी झाली. याप्रकरणी निवृत्ती शेडगे (रा. जळोची, बारामती) याच्या विरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेने या प्रकरणी फिर्याद दिली.

गुरुवारी (दि. १) रोजी दुपारी दीडच्या सुमारास हा प्रकार घडला. पोलिसांनी शेडगे याच्या विरोधात जीवे मारण्याचा प्रयत्नासह विनयभंग व अन्य कलमांनुसार गुन्हा दाखल केला. ही महिला येथे भाडोत्री घरामध्ये राहते. तिने एका पतसंस्थेकडून काही रक्कम काढून आणली होती. ती कपाटामध्ये ठेवत असताना शेडगे हा तेथे आला. त्याने हातात पेट्रोलची बाटली आणली होती. तु माज्याबरोबर शरीर संबंध ठेवणार का, अशी विचारणा त्याने केली.

महिलेने त्याला तुज्याशी कसलेही संबंध ठेवायचे नाहीत, तु घराबाहेर जा असे सांगितले. त्यावर चिडून जावून त्याने हातातील बाटलीतील पेट्रोल फिर्यादीच्या मागील बाजूने टाकले. काडी पेटीने काडी ओढत तिला पेटवून दिले. या घटनेत महिलेच्या साडीने पेट घेतला. त्यानंतर तो तेथून पळून गेला. त्याच स्थितीत ही महिला घरातून बाहेर ओरडत आली. शेजारील लोकांनी आग विझवत तिच्या नातेवाईकांना माहिती दिली. त्यांनी तिला रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या घटनेत ती जखमी झाली असून आगीमुळे घरातील साहित्यही जळाले.

# दिल्लीहून हैदराबादसाठी विमान उडाले, पण प्रवाशाला अपस्मारचा झटका आल्याने...



**■नागपूर। प्रतिनिधी,**
दिल्लीहून हैदराबादकडे निघालेल्या एका प्रवाशाला अपस्मारचा झटका आल्याने विस्ताराचे विमान नागपुरात गुरुवारी वैद्यकीय आपातकालिन स्थितीत (इमजरन्सी लँडिंग) उतरवण्यात आले.

विनयकुमार गोयल (वय ४४) हे विस्ताराच्या विमानाने दिल्लीहून हैदराबादला निघाले होते. विमान हवेत असताना त्यांना अपस्मारचा झटका आला आणि ते पडले. त्यांच्या खांद्याला गंभीर दुखापत झाली. त्यामुळे वैमानिकाने नागपुरात इमरजन्सी लँडिंग केले. गोयल यांना नागपुरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

विस्तारा एअरलाइन्सच्या फ्लाइट क्रमांक व्हीके८२९ या विमानाने दिल्लीहून हैदराबाद प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाला हवाई प्रवासादरम्यान अपस्मारचा झटका आला. प्रवाशाची बिघडलेली प्रकृती पाहता विमान येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर वळविण्यात आले. सध्या या प्रवाशावर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनात किम्स-किंग्ज्वे रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

विनय कुमार गोयल (वय ४४) असे या प्रवाशाचे नाव आहे. गोयल हे विस्तारा एअरलाइन्सने हैदराबाद येथे जात होते. दरम्यान, त्यांना मिरगीचा झटका आला. यामध्ये त्यांचा खांदा निखळला. तसेच जीभ दाताखाली चावल्या गेली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे विमानाचे आपात्कालीन लॅण्डिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, विमानतळ प्रशासनाशी संपर्क साधत आपात्कालीन लॅण्डिंग झाले. विमानतळावर तैनात असलेल्या किम्स-किंग्ज्वे रुग्णालयाच्या वैद्यकीय चमूने प्राथमिक तपासणी करून तात्काळ रुग्णालयात दाखल करण्याचा निर्णय घेतला. सध्या गोयल यांच्यावर मेंदूरोगतज्ज्ञ डॉ. प्रतीक उत्तरवार यांच्या मार्गदर्शनात उपचार सुरू आहे.

डॉ. उत्तरवार म्हणाले,ह्यगोयल यांना मेंदूशी संबंधित इडिओपॅथीक इंट्राक्रॅनिअल हायपरटेन्शन (आयआयएच) हा आजार आहे. त्यावर चंदीगड येथे गोयल उपचार घेत आहेत. दरम्यान, हवाई प्रवास करताना त्यांना अचानक फिट्स आल्यात आणि त्यांची प्रकृती खालावली. इस्पितळात दाखल करण्यात आले तेव्हा ते बेशुद्धावस्थेत होते. येथे त्यांचे स्कॅनिंग करण्यात आले असून मेंदूच्या नसेत क्लॉट असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार, त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत. सध्या प्रकृती स्थिर असून परवा सुटी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, वैद्यकीय कारणाने आपात्कालीन लॅण्डिंग झालेले हे विमान काही वेळाने उर्वरित प्रवाशांना घेऊन हैदराबादकडे रवाना झाले.

# चंद यांची 'फाईन' कामगिरी; विनातिकिट प्रवास करणाऱ्यांकडून १ कोटींची दंड वसुली



**■मुंबई। प्रतिनिधी,**
मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील तिकिट तपासनीस मोहम्मद शम्स चंद पुन्हा एकदा चर्चेत आहेत. २०२३-२४ या आर्थिक वर्षात त्यांनी आतापर्यंत १ कोटींचा दंड वसूल केला आहे. विनातिकिट प्रवास करणाऱ्या १० हजार ६८६ जणांविरोधात त्यांनी आतापर्यंत कारवाई केली आहे. चंद यांनी केलेल्या दंड वसुलीमुळे मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाला मोठा महसूल मिळाला आहे.

२०२१-२२ या आर्थिक वर्षात चंद यांनी १.२५ कोटी रुपयांचा दंड गोळा केला होता. आता त्यांनी पुन्हा एकदा १ कोटींचा टप्पा ओलांडला आहे. २०२३-२४ मध्ये मुंबई विभागात आतापर्यंत एकूण तीन टिसींनी १ कोटी दंड वसूल केला आहे. सुनील नैनानी यांनी १० हजार ४२८ जणांविरोधात कारवाई करत १ कोटी २ हजार ८३० रुपयांचा दंड गोळा केला आहे. तर एम. एम. शिंदे यांनी ११ हजार ३६७ जणांकडून १ कोटी १ लाख ३२ हजार ८७० रुपयांचा दंड वसूल केला आहे. हे दोघेही वरिष्ठ तिकिट तपासनीस पदावर कार्यरत आहेत.

विनातिकिट प्रवास करणाऱ्यांकडून कोटी रुपयांचा दंड वसूल करणाऱ्या तिकिट तपासनीसांनी त्यांच्या सहकाऱ्यांसमोर उत्तम उदाहरण ठेवलं आहे. त्यांच्यामुळे रेल्वेला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो.

# पाकिस्तानच्या क्रमांकावरून संदेशाद्वारे धमकी

**■पुणे। प्रतिनिधी,**
नवी पेठ येथील पूना हॉस्पिटलमध्ये बॉम्ब ठेवल्याची धमकी देणारा संदेश आल्यानंतर घबराट उडाली. गुरुवारी मध्यरात्री पोलिसांनी रुग्णालयाची पाहणी केली. तेव्हा बॉम्बसदृश कोणतीही वस्तू सापडली नाही. पाकिस्तानच्या क्रमांकावरून संदेश पाठवून रुग्णालय उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती.

पोलीस नियंत्रण कक्षातील व्हॉट्स ॲपवर रात्री साडेअकाराच्या दरम्यान पाकिस्तानच्या क्रमांकावरून एक संदेश आला. पाकिस्तानी कैदीयोको छोड दो, वरना पूना हॉस्पिटल को बॉम्बसे उडा देंगे असा तो संदेश होता. ही माहिती विश्रामबाग पोलीस, तसेच बॉम्ब शोधक पथकाला देण्यात आली. बॉम्बच्या अफवेमुळे परिसरात घबराट उडली होती. बॉम्ब शोधक पथकाने पूना हॉस्पिटलमधील मेडिकल, पार्किंग, प्रत्येक खोली आणि संशयास्पद वस्तूंची तपासणी केली. साधारणपणे दोन तास तपासणी करण्यात आली. यात कोठेही बॉम्बसदृश वस्तू आढळून आढळून आली नाही. खोडसाळपणे पोलीस नियंत्रण कक्षाला संदेश केल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस नियंत्रण कक्षाला संदेश पाठविणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्यात येत आहे.

# नारायण राणे यांना लोकसभेवर पाठवण्याचा मोदींचा प्लॅन असू शकतो, केसरकरांनी लॉजिक सांगितलं



**■सिंधुदुर्ग। प्रतिनिधी,**
राज्यसभा खासदारांना लोकसभेत पाठविण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची योजना आहे. कदाचित केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना सुद्धा लोकसभेचं तिकीट देण्याची नरेंद्र मोदी यांचा प्लॅन असू शकतो, असे संकेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे प्रवक्ते आणि शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिले.

**काय म्हणाले दीपक केसरकर?**

राज्यसभेच्या खासदारांना लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची योजना आहे. कदाचित केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनाही लोकसभेची उमेदवारी देण्याची नरेंद्र मोदींची योजना असू शकतो, जर का राणे निवडणुकीच्या रिंगणात असतील, तर ते नक्कीच विजयी होतील, कारण त्यांच्याबद्दल कोकणी जनतेच्या मनात आत्मीयता आहे, असा विश्वास मंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केला.

याचा फायदा नारायण राणे यांना होऊ शकतो. ते उमेदवार असतील तर त्यांना शंभर टक्के पाठिंबा असेल, असं मत व्यक्त करताना नारायण राणे रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवार असू शकतील, अशा पद्धतीचे संकेत आज शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सावंतवाडीत येथे दिले.

**महायुतीत रस्सीखेच**

रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून सध्या शिवसेनेचे विनायक राऊत खासदार आहेत. राऊत सलग दुसऱ्यांदा खासदार असून ते सध्या ठाकरे गटात आहेत. त्यांना पुन्हा एकदा उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे महायुतीत रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघावरुन रस्सीखेच सुरु आहे.

# संमेलनाध्यक्ष शोभणे यांचा सरकारला इशारा; ९७ व्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन



**■उरण। प्रतिनिधी,**
बेरोजगारीचा प्रश्न खूपच गंभीर झाला आहे. बेरोजगारीच्या याच विवंचनेतून शेतकऱ्यांप्रमाणे उद्या तरुणही जीवन संपवू लागले तर ते खापर कुणाच्या माथ्यावर फोडायचे? एक लक्षात ठेवा, तरुणांची ऊर्जा वाहत्या पाण्यासारखी असती. ती जशी सृजनाची गंगोत्री होऊ शकते, तशी तरुणांच्या हिताचे न घडल्यास प्रलयाचे कारणही ठरू शकते, अशा थेट शब्दात संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी सरकारला इशारा दिला.

९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उदघाटन शुक्रवारी अमळनेर येथे झाले. यावेळी शोभणे अध्यक्ष पदावरून बोलत होते. या संमेलनाला लोकसभेच्या माजी अध्यक्ष सुमित्रा महाजन यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार, भाषा व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर. राज्याचे पाणीपुरवठा मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील. ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे व महामंडळाचे सर्व पदाधिकारी, आयोजक उपस्थित होते. यावेळी संमेलनाध्यक्ष म्हणाले, शिक्षण क्षेत्रात आता आपल्याला काहीही करायचे नाही, असे ठरवून सरकारने या क्षेत्राकडे पाठ फिरवली आहे. एकीकडे प्राध्यापकांच्या जागा रिकाम्या आहेतर तर दुसरीकडे आज हजारो उच्चशिक्षित तरुण प्राध्यापकाची नोकरी मिळवण्याच्या प्रतीक्षेत म्हातारे झाले आहेत. शिक्षणाचा बाजार करणारी मंडळी शिक्षण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी बसली आहे. हे खुप धोकादायक आहे. तरुणाईचा तुम्ही किती अंत पाहणार आहात. असा खडा सवालही शोभणे यांनी केला. प्राचिन काळी धर्म सर्वोच्चपदी होता. धर्मसत्ताक राज्येही धर्माची वेगळी गरज म्हणून निर्माण झाली. पुढे राजसत्तेने धर्मसत्तेचे जोखड झुगारून देत धर्मसत्तेलाच आपल्या अंकित ठेवले.पुढे हाच राजा सर्वोच्च समजला जाऊ लागला, धर्माचा रक्षणकर्ता म्हणून ओळखला जाऊ लागला, इतिहासाची हीच चक्रे आता पुन्हा नव्या रूपाने फिरू लागली आहेत, याकडेही शोभणे यांनी आपल्या भाषणात आवर्जुन लक्ष वेधले.

# पुणे लोकसभेसाठी मनसेचे पाच शिलेदार शर्यतीत, राज ठाकरेंकडे लेकाने सोपवली यादी




**■पुणे। प्रतिनिधी,**
लोकसभा निवडणुकीसाठी अवघे काही महिने शिल्लक असताना आता राज्यातील सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने देखील आपल्या नशीब आजमावण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने मनसेकडून काही मोजक्या जागांवर जोरदार तयारी करण्यात येत आहे. त्यातीलच एक लोकसभा मतदारसंघ म्हणजे पुणे. पुणे लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपले सुपुत्र अमित ठाकरे यांच्यावर सोपवली होती. अमित ठाकरे हे पुणे लोकसभा मतदारसंघाचे प्रभारी म्हणून काम पाहत आहेत. त्यामुळे मनसेने पुण्यात जोरदार ताकद लावली आहे.

या अनुषंगाने आता पुण्यातून मनसेतर्फे लोकसभा निवडणूक लढू इच्छिणाऱ्यांची नावे राज ठाकरे यांना कळविण्यात आली आहेत. पुणे लोकसभेचे प्रभारी असलेले अमित ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्याकडे इच्छुकांची नावं सुपूर्द केली आहेत. यामध्ये वसंत मोरे, साईनाथ बाबर, बाबू वागसकर, किशोर शिंदे, गणेश सातपुते यांच्या नावांचा समावेश आहे. या नावांमध्ये वसंत मोरे आणि साईनाथ बाबर यांनी आपली दावेदारी यापूर्वीच ठोकलेली आहे. तर बाबू वागस्कर, किशोर शिंदे आणि गणेश सातपुते हे देखील पुणे मनसेतील मोठी नावं असल्याने मनसेमध्ये निवडणूक लढवण्यासाठी अंतर्गत चुरस पाहायला मिळत आहे. पुण्याप्रमाणेच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे राज्यात ज्या लोकसभा मतदारसंघात मनसे निवडणूक लढवणार आहे, तेथील सर्वच प्रभारींनी इच्छुकांची नावे राज ठाकरे यांच्याकडे दिली आहेत. मात्र पुणे लोकसभा मतदारसंघात अमित ठाकरे यांनी स्वतः लक्ष घातल्यामुळे मनसेने ही निवडणूक प्रतिष्ठेची बनवली आहे. त्यामुळेच पुण्यात मनसेने जोरदार ताकद लावली आहे. सर्वप्रथम मनसेचे माजी नगरसेवक आणि माजी शहराध्यक्ष वसंत मोरे यांनी लोकसभा निवडणूक लढवणार असल्याची दावेदारी ठोकली होती.

# अजित पवार म्हणतात, पाडळसरे प्रकल्पासाठी केंद्राची मदत घेऊ

**■जळगाव। प्रतिनिधी,**
अमळनेर तालुक्यातील पाडळसरे प्रकल्पाच्या कामासाठी ४८९० कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता शासनाने दिली आहे. सात उपसा सिंचन योजनांचे काम सुरू करण्यासाठी केंद्राची मदत मिळणार आहे. जून २०२५ पर्यंत या प्रकल्पाच्या माध्यमातून पाणी अडवण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाच्या कामांसाठी केंद्र शासनाची मदत घेऊन निधी कमी पडू दिला जाणार नसल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अमळनेर तालुक्यातील पाडळसरे निम्न तापी प्रकल्प धरणाची शुक्रवारी पाहणी केली. याप्रसंगी पालकमंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक एम. राजकुमार आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, तापी प्रकल्पाचे मध्य प्रदेश, गुजरात व महाराष्ट्रात समन्यायी पाणी वाटपाचा प्रश्न मार्गी लावण्यात केंद्र शासनाला अडचण नसल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या सर्व समस्यांची शासनकर्ते म्हणून आम्हाला जाण आहे. महाराष्ट्रातील सर्व गावांना जलजीवन मिशनच्या माध्यमातून पाणी देण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील यांनी, पाडळसरे प्रकल्प दोन जिल्ह्यांना संजीवनी ठरणारा प्रकल्प असून आर्थिक निधीसाठी केंद्राच्या मंजुरीसाठी प्रस्ताव आहे.